# नीट व इतर परीक्षांच्या तयारीसाठी आदिवासी उमेदवारांना विनामूल्य प्रशिक्षण



**अकोला :** एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पातर्फे अकोला, वाशिम, बुलढाणा या तीन जिल्ह्यांतील इयत्ता १० वी उत्तीर्ण होणाऱ्या अनुसूचीत जमातीच्या विद्यार्थ्यांना नीट व सीईटी-जेईई आदी परीक्षांच्या पूर्वतयारीसाठी प्रशिक्षण देण्यात येणार आहे.प्रशिक्षणार्थीची निवड चाळणी परीक्षेद्वारे होईल. त्यानुसार सर्व शासनमान्यता प्राप्त शासकीय,अनुदानित, विनाअनुदानित शाळा,आदिवासी विकास विभागांतर्गत असलेल्या शासकीय, अनुदानित आश्रमशाळा आदी शाळेच्या मुख्याध्यापकांनी आपल्या शाळेतील मार्च २०२५ मध्ये इयत्ता १० वी ची परीक्षा दिलेल्या व शैक्षणिक सत्र २०२३-२४ मध्ये इयत्ता ९ वी मधील गुणानुक्रमे प्रथम पाच मुले व प्रथम पाच मुली यांचे आवेदनपत्र प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला, न्यू राधाकिसन प्लॉट, महसूल भवन अकोला. येथे दि.९ एप्रिलपर्यंत सादर करावेत. अर्जाचे नमुने शिक्षणाधिकारी, (माध्यमिक) जिल्हा परिषद व शासकीय, अनुदानित आदिवासी आश्रमशाळांमध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहेत. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सदर परीक्षेमध्ये सहभागी होण्याचे आवाहन प्रकल्प अधिकारी, मोहनकुमार ग. व्यवहारे यांनी केले आहे.

# अकोला पोलीस दलात सेवा (S.E.V.A.) प्रणाली कार्यान्वीत

**■अकोला,दि २७ (प्रतिनिधी)**

मा. मुख्यमंत्री १०० दिवस कृती आराखडा कार्यक्रम अंतर्गत राहणीमान, तक्रारीचे निवारण, कामाच्या ठिकाणी सुविधा संबंधीत उपक्रमा अंतर्गत ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात येत आहे. अकोला जिल्हयामध्ये पोलीस स्टेशनमध्ये आलेल्या अभ्यागतांची / तक्रारदारांची तकार कमीत कमी वेळात विनाविलंब पुर्ण होवून, त्यातुन समाधान होणे हे असुन, त्यामुळे पोलीसांची जनमानसातील प्रतिमा उंचविण्यास मदत होणार आहे. सदर यंत्रणा राबवितांना पोलीस स्टेशनमध्ये विविध कामासाठी आलेलया अभ्यागतांची माहिती या यंत्रणेव्दारे संगणकामध्ये संकलीत होणार आहे.

त्या अनुषंगाने अकोला जिल्ह्यात दि. २७/०३/२०२५ पासुन अकोला जिल्हयात डए.त.अ. (Service Excellence and Victim Assistance) ची प्रायोगीक तत्वावर अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे. दि. २१ फेबुवारी व २५ फेबुवारी २०२५ रोजी विजय हॉल पोलीस अधीक्षक कार्यालय अकोला येथे सेवा बाबत पोलीस स्टेशनचे सेवा सेल मध्ये काम करणारे अंमलदार यांना सेवा सेल हाताळण्याचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. सदर उपक्रमा करीता लागणारे टॅब डी.



पी. सी. फंडातुन उपलब्ध करून देण्यात आले आहेत त्यानुसार अकोला जिल्हयातील २३ पोलीस स्टेशन, ४ उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, अंतर्गत सेवा कार्यप्रणाली सुरु करण्यात आली आहे.

उददेश :- सदर सेवा यंत्रणा कार्यन्वीत करण्याचा मुळ उददेश, पोलीस स्टेशनला / उप विभागीय पो.अ. कार्यालय येथे आलेल्या तक्रारींची निर्गतीचे काम कमीत कमी वेळात विनाविलंब पुर्ण होवून त्यातुन तक्रारदाराचे समाधान करणे हा आहे. त्यामुळे पोलीसांची जनमानसातील प्रतिमा उच्चविण्यास मदत होणार आहे. सदर यंत्रणा राबवितांना पोलीस स्टेशन मध्ये विविध कामासाठी आलेल्या अभ्यागतांची थोडक्यात माहिती या यंत्रणेव्दारे संकलीत होणार आहे. तक्रारदाराने पोलीस स्टेशनला पुर्वीच तक्रार दिली असल्यास त्याबददल केंद्रीय कार्यालयामार्फत संबंधीत पोलीस स्टेशनला विचारणा करण्यात येणार आहे.

कार्यप्रणाली :- अकोला घटकातील प्रत्येक पोलीस स्टेशन, उप विभागीय पो.अ. कार्यालय येथे भेट देणारे अभ्यांगत यांची नोंद सेवा प्रणालीचे माध्यमाने देण्यात येईल. यामध्ये अभ्यांगताचे नाव, मोबाईल नंबर, फोटो, येण्याची वेळ कोणाला भेटायचे आहे, तक्रारीचे स्वरुप, येण्याजाण्याची वेळ इत्यादी डाटा फिडींग सेवा प्रणालीचे माध्यमाने केंद्रीयस्तरावर करण्यात येणार असून, सायबर सेल यांचे सर्व्हर मध्ये घेण्यात येईल. या कार्यप्रणालीवर सायबर सेल सेवा कक्ष यांची देखरेख असणार आहे.

Feedback :- अभ्यांगतांच्या / तक्रारदारांच्या तक्रारीच्या तपशिलाचे नोंदीबाबत पोलीस स्टेशनच्या प्रभारी अधिकारी यांचा दररोज आढावा घेण्यात येणार आहे. उप विभागीय पोलीस अधिकारी व अपर पोलीस अधीक्षक यांनी दर ३ दिवसांनी आढावा घेणार आहेत. पोलीस अधीक्षक कार्यालय मध्ये सेवा कक्ष हे या कार्यासाठी कार्यन्वीत करण्यात आले आहे. त्यामध्ये १ सपोनि ३ पोलीस अंमलदार हे सदर अभ्यांगतांच्या नोंदीवरुन संबंधीत अभ्यांगतांना फोन / मोबाईल / इत्यादी व्दारे संपर्क करुन अभ्यांगतांचे पोलीस स्टेशनच्या तक्रार निवारण व मदत याबाबत अभिप्राय घेतील. व त्याचे तक्रारींचे निराकरण झाले कींवा नाहि याबाबत माहीती घेवुन त्याचे ०७ दिवसात तक्रारीचे निवारण करण्यास मदत करतील. तक्रारीचे निराकरण न झाल्यास वरीष्ठ अधीकारी स्वत: विचारपुस करतील व शंका निरसन करणार आहेत.

# नविन वर्ष चैत्र शुद्ध गुढीपाडव्याला ज्योतिष्यांचे मनोमिलन व पंचांग पुजन

**■अकोला,दि २७ (प्रतिनिधी)**

प्रतिवर्षानुसार याही वर्षी नविन वर्ष चैत्र शुद्ध १ गुडीपाडवा रविवार दि. ३० मार्च २०२५ रोजी संध्याकाळी ५ ते ६ या दरम्यान ज्योतिष्यांचे मनोमिलन व पंचांग पुजनाचे आयोजन कल्याण ज्योतिष्य कार्यालय, पसायदान मंगल कार्यालया समोर, डाबकी रोड, अकोला येथे करण्यात आले आहे. या आयोजनांच्या वेळी सर्वांना या वर्षी धनवृद्धी, चांदीचा शिक्का देण्याचे प्रयोजन आहे. आपले नविन पंचांग सोबत आणावे ही विनंती. सर्व ज्योतिष्य वर्गांनी आवर्जुन उपस्थित राहावे असे आवाहन कल्याण ज्योतिष्य केंद्रातर्फे प्रल्हाद शिलवंत यांनी केले आहे. अधिक माहिति



करिता मो.९८२२४६१८०५ या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन केले आहे.

# सीलच्या कारवाईत अरेरावीची भाषा करुन सरकारी कामात अडथडा निर्माण करणाऱ्या

## मालमत्ता धारकांविरुध्द पोलीस स्टेशनला तक्रार

**■अकोला,दि २७ (प्रतिनिधी)**

दि. २७ मार्च २०२५ - शिवर येथील पुर्व झोन अंतर्गत वार्ड क्र. अे-१० मालमत्ता क्र. ६१३, दुर्गा माता मंगल कार्यालय यांच्या कडे सन २०१७ ते २०२५ पर्यंतचा एकुण मालमत्ता कर रूपये एकुण ८,६६,१९२/- थकित असल्याने दि. २६/०३/२०२५ रोजी सिलची कार्यवाही करण्यात आली होती. सदर कार्यवाहीत पुर्व झोन चे सहाय्यक आयुक्त विजय पारतवार, सहा. अधिक्षक तथा जप्ती पथक प्रमुख राजेश सरप, सहा. कर अधीक्षक देवेंद्रकुमार भोजने, कर वसुली लिपिक प्रकाश थुकेकर, लिपिक प्रफ्फुल हंबीर, शिपाई कृष्णराव वाकोडे व सुरक्षा रक्षक संगिता शिंदे हे उपस्थित होते.

सदर कार्यवाही दरम्यान जगदिश मुस्मकार यांनी वाद निर्माण करून अधिकाऱ्यांशी अरेरावीची भाषा करून व वाद-विवाद करून सरकारी कामामध्ये अडथळा निर्माण केला होता. त्यामुळे मनपा उपायुक्त गीता ठाकरे तसेच अतिक्रमण विभाग प्रमुख चंद्रशेखर इंगळे व त्यांची टिम घटनास्थळावर दाखल झाली असून जगदीश मुस्मकार यांनी त्यांचयाशीही वाद केला होता त्यामुळे विजय पारतवार यांनी जगदीश मुस्मकार यांचेवर एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दाखल केली आहे.

अकोला महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांनी आपला थकित व चालू वर्षातील मालमत्ता कराचा भरणा वेळेच्या आत करून सील/जप्ती व लिलाव सारख्या अप्रीय कारवाई टाळून मनपा प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन प्रशासनाव्दारा करण्यात येत आहे.

# दुय्यम निबंधक कार्यालय २९ ते ३१ मार्च सुरु राहणार

**■अकोला,दि २७ (प्रतिनिधी)**

वार्षिक बाजारमुल्य दर तक्ते दरवर्षी १ एप्रिल रोजी प्रसिद्र होत असल्याने दुय्यम निबंधक कार्यालयात मार्च महिन्यात दस्त नोंदणीसाठी पक्षकारांची गर्दी होत असते.

तसेच महत्वाच्या सणांमुळे देखील दस्त नोंदणीसाठी दुय्यम निबंधक कार्यालयात पक्षकारांची गर्दी वाढत आहे. हे लक्षात घेऊन आर्थिक वर्ष २०२४-२५ या वर्षाचा इष्टांक पुर्ण करण्याच्या दुष्टीने दि. २९ मार्च या आर्थिक वर्ष अखेर असलेल्या सुटीच्या दिवसात सर्व नोंदणी कार्यालये सुरु ठेवण्यात येणार आहे. तरी सर्व जनेतेने या सुविधेचा लाभ घ्यावा असे आवाहन आर. पी. भालेराव प्र.सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी अकोला यांनी केलेले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती व संविधान अमृत महोत्सवानिमित्त शिलाई मशीन वाटप

अकोला : १४ एप्रिल हा केवळ साधा दिवस नाही, तर तो समानतेच्या लढ्याचे प्रतीक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आयुष्यभर सामाजिक न्याय, समता, शिक्षण आणि आर्थिक स्वावलंबन यासाठी संघर्ष केला. त्यांनी दिलेले संविधान हा केवळ कायद्याचा ग्रंथ नाही, तर संपूर्ण समाजाला दिशा दाखवणारा दीपस्तंभ आहे. संविधान अमृत महोत्सवाच्या या पवित्र क्षणी त्यांचे विचार प्रत्यक्ष आचरणात आणण्याचा संकल्प करण्याचे आवाहन सामाजिक कार्यकर्ते निलेश देव यांनी केले आहे. महिलांचे शिक्षण आणि आर्थिक स्वावलंबन हे बाबासाहेबांचे स्वप्न होते. पण आजही अनेक महिला कौशल्य असूनही आर्थिक अपुरेपणा मुळे मागे राहतात. याच विचारातून निलेश देव मित्र मंडळ एक अनोखा उपक्रम राबवत आहे महिला सक्षमीकरणासाठी शिलाई मशीन वाटप.

# जिल्हा कारागृहात कैद्यांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम



**■अकोला,दि २७ (प्रतिनिधी)**

जिल्हा कारागृहात सांस्कृतीक कार्य विभागाच्या सहकार्याने कैद्यांसाठी 'जीवन गाणे गातच जावे- देशभक्ती, संस्कृती आणि प्रबोधन' हा प्रबोधनात्मक कार्यक्रम मंगळवारी झाला.

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक (कारागृह व सुधारसेवा) सुहास वारके यांच्या आदेशान्वये विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह) जालिंदर सुपेकर यांच्या मार्गदर्शनात हा कार्यक्रम झाला.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव योगेश पैठणकर यांच्या हस्ते दीप प्रज्ज्वलन व महापुरूषांच्या प्रतिमांचे पूजन करून उद्घाटन करण्यात आले. कारागृहाचे प्र. अधिक्षक ज्ञानेश्वर बा. पाटील अध्यक्षस्थानी होते.

कार्यक्रमात देशप्रेम, राष्ट्रभक्ती, संस्कृती व भक्तीभाव आदींबाबत गीतगायन व इतर कलाप्रकार सादर करण्यात आले. सांस्कृतिक विभागाचे समन्वयक विकास पल्हाडे यांनी संयोजनाची जबाबदारी पार पाडली. कारागृह अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## थोडक्यात

# ५ मालमत्तांवर सीलची कारवाई

**अकोला :** मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा उपायुक्त गीता ठाकरे आणि कर अधिक्षक विजय पारतवार यांच्या मार्गदर्शनात अकोला महानगरपालिका क्षेत्रातील पुर्व झोन अंतर्गत शिवर येथील वार्ड क्रं. अे-१० मालमत्ता क्रं. २५७ धा.प्रदीप/प्रशांत यांचेकडे २०२२-२३ पासून आज पर्यंतचे एकुण रक्कम रूपये २,९३,३८२/- एवढा मालमत्ता कर थकित असल्याने त्यांच्या मालमत्तावर सील लावण्याची कारवाई करण्यात आली आहे.सदरची कारवाई सहा.आयुक्त विजय पारतवार यांच्या मार्गदर्शनात झाली असून कारवाईत सहा.अधिक्षक तथा पथक प्रमुख राजेश सरप, सहा.कर अधिक्षक देवेंद्र भोजने, प्रकाश थुकेकर, प्रफुल हंबीर, श्रीकृष्णराव वाकोडे, सुरक्षा रक्षक संगीता शिंदे आदींची उपस्थिती होती. याचसोबत उत्तर झोन अंतर्गत सिटी कोतवाली समोरील येथील वार्ड क्रं. सी-१ मालमत्ता क्रं. ७४२ धा.सुरेश व संतोष अग्रवाल, शे.सादिक शे.हसन यांचेकडे २०१७-१८ पासून आज पर्यंतचे एकुण रक्कम रूपये २,८९,०७४/- एवढा मालमत्ता कर थकित असल्याने, तसेच जुना कपडा बाजार येथील वार्ड क्रं. सी-१ मालमत्ता क्रं. ५७९ खंडेलवाल धा. दिनेश अग्रवाल, दिपक अग्रवाल यांचेकडे २०१७-१८ पासून आज पर्यंतचे एकुण रक्कम रूपये ४,८६,१४८/- एवढा मालमत्ता कर थकित असल्याने, तसेच गांधी रोड येथील वार्ड क्रं. सी-१ मालमत्ता क्रं. ७३५ भाईचंद रायसोनी मल्टीस्टेट को-ऑप.सोसायटी, पवनकुमार गोयनका यांचेकडे २०१७-१८ पासून आज पर्यंतचे एकुण रक्कम रूपये २,७३,४१२/- एवढा मालमत्ता कर थकित असल्याने सदर तीन्ही मालमत्तांवर सील लावण्याची कारवाई करण्यात आली आहे. सदरची कारवाई सहा.आयुक्त विठ्ठल देवकते यांच्या मार्गदर्शनात व उपस्थितीत झाली असून कारवाईत सहा.कर अधीक्षक हेमंत शेळवणे, मोहन घाटोळ, संतोष गाढेकर, सुनील नकवाल, मेश्राम, सुरक्षा रक्षक बाली इंगळे आदींची उपस्थिती होती. अकोला महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता धारकांनी ३१ मार्च २०२५ पर्यत मनपा व्दारा सुरू असलेल्या शास्ती अभय योजनेचा लाभ घेऊन आपला थकित व चालू वर्षातील मालमत्ता कराचा भरणा एकरकमी करून सील व जप्ती सारख्या अप्रीय कारवाई टाळावे.

# जात पडताळणी अर्जातील त्रुटी पूर्ततेसाठी ८ एप्रिलला शिबिर

**■अकोला,दि २७ (प्रतिनिधी):**

जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या वतीने दि. ८ एप्रिल रोजी जात पडताळणी अर्जातील त्रुटींची पूर्तता करून घेण्यासाठी विशेष त्रुटी पूर्तता व अर्ज स्वीकृती शिबिर आयोजिण्यात आले आहे.

शिबीराचा लाभ घेण्यासाठी सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात इयत्ता ११ वी, १२ वी विज्ञान शाखेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांची जात वैधता प्रमाणपत्राच्या अभावी त्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये व पुढील शिक्षणापासुन वंचित राहू नये त्याकरिता विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना मिळावे यासाठी हे शिबीराचे आयोजन करण्यात येत आहे.

तसेच अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, शैक्षणिक व सामाजिक मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांनी सन २०२५-२६ या वर्षात जेईई, नीट, सी.ई.टी अशा विविध व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज भरलेले आहे. अशा मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी जात पडताळणी समितीकडे त्यांचे जातीदावा प्रकरण दाखल केलेले आहे.

परंतु जातीदावा प्रकरणातील कागदपत्रे पुरावा अभावी त्रुटी आढळुन आल्याने अद्यापपर्यंत ही ज्या विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळाले नाही. अशा विद्यार्थी-विद्यार्थीनी दि. ८ एप्रिलपूर्वी विशेष मोहिम शिबीराच्या दिवशी कार्यालयीन वेळेत समितीकडे दाखल केलेल्या जातीदावा प्रकरणांची पावती व त्रुटी पुर्ततेच्या मूळ कागदपत्रांसह समिती कार्यालयात जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समिती अध्यक्ष जितेंद्र सा. काकुस्ते, उपायुक्त अमोल मो. यावलीकर व संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव मनोज मेरत यांनी केले आहे.

समिती कार्यालयाचा पत्ता जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, अकोला जिल्हाधिकारी कार्यालय परिसर प्रशासकीय इमारत, दुसरा माळा, अकोला असा आहे.

# खानापूर येथे अवैध दारू व्यवसायाविरोधात महिलांचा एल्गार

## पोलीस ठाण्यात निवेदन सादर

**■पातूर,दि २७ (प्रतिनिधी):**

मौजा खानापूर गावातील अवैध दारू व्यवसायावर कायमस्वरूपी कारवाई करण्याची मागणी करत आज गावातील महिलांनी व ग्राम स्थांनी पातूर पोलीस ठाणे आणि तहसीलदार यांना लेखी निवेदन दिले. या निवेदनात गावातील वाढत्या अवैध दारू व्यवसाया मुळे समाजात निर्माण होत असलेल्या गंभीर समस्यांकडे लक्ष वेधण्यात आले आहे.

ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, मौजा खानापूर येथे सध्या १० ते १२ ठिकाणी अवैध दारू विक्रीचा व्यवसाय सुरू आहे. या दारू विक्रीमुळे गावातील तरुण मोठ्या प्रमाणात व्यसनाधीन होत असून, अनेक कुटुंब उद्ध्वस्त झाली आहेत. दारूमुळे पुरुष मद्यधुंद होऊन घरातील स्त्रिया आणि मुलांवर हिंसाचार करत आहेत.

या परिस्थितीला कंटाळून काही महिलांनी घर सोडले असल्याचेही सांगण्यात आले. गावातील महिलांनी सांगितले की, दारूच्या नशेत असलेल्या व्यक्ती रस्त्यावर वावरत असतात आणि शाळेत जाणाऱ्या किशोरवयीन मुलींना त्रास देतात.



त्यामुळे अनेक मुली शाळेत जाण्यास घाबरत आहेत. गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांचा गावातील वावर वाढला असून, वारंवार वाद आणि भांडणांचे प्रमाणही वाढले आहे.

गावातील ग्रामस्थांनी अनेकदा या अवैध दारू विक्रेत्यांना समज दिली, परंतु त्यांनी धंदा बंद करण्यास नकार दिला. यामुळे महिलांनी ठाणेदार आणि तहसीलदारांकडे निवेदन देत कठोर कारवाईची मागणी केली आहे.

या निवेदनावर गावातील ५० हून अधिक महिलांनी सह्या केल्या असून, आम्रपाली सदार, मीना शिरसाट, पद्मना इंगोले, सुनीता गिरे, नलिनी धाडसे यांचा पुढाकार होता. या महिलांनी पोलीस अधीक्षक यांच्याकडेही प्रत निवेदन पाठवले आहे.महिलांनी इशारा दिला आहे की, जर अवैध दारू विक्रीवर लवकर कारवाई झाली नाही, तर ग्रामस्थ रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करतील. गावातील कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी हा अवैध व्यवसाय बंद करणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.महिलांच्या या मागणीवर पातूर पोलिसांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून, लवकरच छापेमारी करून कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिले आहे. तहसीलदार डॉ. राहुल वानखडे यांनीही अवैध व्यवसाय थांबवण्यासाठी आवश्यक ती पावले उचलली जातील, असे सांगितले.

ग्रामस्थ आता प्रशासनाच्या कारवाईकडे लक्ष ठेवून आहेत. अवैध दारू व्यवसाय बंद होतो की महिलांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागतो, हे लवकरच स्पष्ट होईल.

# श्रीराम नवमी शोभायात्रा महानगराचा समृध्द व सांस्कृतिक वारसा

**■अकोला,दि २७ (प्रतिनिधी):**

अयोध्येतील श्रीराम जन्मभूमी जागरणाकरिता वर्ष १९८६ ला संपूर्ण देशभरात विश्व हिंदू परिषदेच्या माध्यमातून श्रीराम नवमी शोभायात्रा काढण्यात आल्या होत्या. त्याच अनुसरून राजराजेश्वर महाराजांच्या अकोला महानगरीत सुद्धा शोभायात्रा सुरू करण्यात आली होती. विश्व हिंदू परिषदेच्या संकल्पनेने व आ स्व.श्री.गोवर्धन शर्मा यांच्या प्रयत्नाने या शोभायात्रेला भव्य दिव्य स्वरूप प्राप्त करून दिले व ही शोभायात्रा संपूर्ण विदर्भातील नागपूर नंतर सर्वात मोठी शोभायात्रा म्हणून प्रसिद्ध झाली. सर्व समाजाला सोबत घेऊन श्रीरामजी सारखे समरसतेचा संदेश या शोभायात्राद्वारे स्व. आ गोवर्धन शर्मा यांनी प्रस्थापित केला. यंदाची शोभायात्रा ६ एप्रिल रोजी साजरी होणार असून हा समृद्ध, सांस्कृतिक वारसा असल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. स्थानीय अग्रसेन भवन येथे संपन्न या पत्रकार परिषदेत या शोभायात्रा ची संपूर्ण माहिती देण्यात आली. यंदाच्या शोभायात्रेत तब्बल ५१ विविध देखावे सादर केले जाणार आहेत.दि ३ एप्रिल रोजी महानगरात शोभायात्रा समितीद्वारे सिटी कोतवाली चौकात भगवान श्रीकृष्ण व कालिया मर्दन नागाचे भव्य चलचित्र देखावा सादर करण्यात येणार आहे. या देखाव्याचे आयोजक गुजरात अंबुजा एक्सपोर्ट



लिमी असून कपडा बाजार चौक येथे सुद्धा धार्मिक देखावा झाकी साकारण्यात येणार आहे. शोभायात्रेचे स्वरूप संपूर्णतः धार्मिक व पारंपारिक पद्धतीचे असून शोभायात्रेमध्ये धर्म ध्वजासह ११घोडेस्वार सहभागी होणार आहे. यात बाल शिवाजी, जिजामाता, महाराणा प्रताप, अहिल्याबाई होळकर, झाशीची राणी लक्ष्मीबाई, राणी ताराबाई, छत्रपती संभाजी महाराज व अन्य महापुरुषांचे घोड्यांवर झाकी सादर करण्यात येणार आहे. तसेच श्रीराम पादुका सह विश्व हिंदू परिषदेचा मानाचा श्रीराम दरबार राहणार आहे.

धार्मिक ५१ विविध धार्मिक झाक्या सह ५० महिला दिंडी मंडळ, १० पुरुष वारकरी संप्रदायक दिंडी मंडळ, ढोल पथक, इत्यादींचा समावेश आहे सर्व झाकी धार्मिक स्वरूपाच्या असून सर्व संप्रदायाच्या राहणार आहेत. रविवार दिनांक ६ एप्रिल रोजी आयोजित या श्रीराम नवमी शोभायात्रा दुपारी ४ वाजता आराध्य दैवत राजेश्वर मंदिरात पादुका पूजन करून शोभायात्रेची सुरुवात होणार आहे.

शहरातील अनेक मान्यवर राजकीय सामाजिक विविध क्षेत्रातील गणमान्य नागरिक यावेळी उपस्थित राहणार असल्याचे सांगण्यात आले.यावेळी रामनवमी निमित्त अयोध्येत १ लाख लाडू पाठविणार असणारे अभ्यंकर मसालेचे संचालकगण यांचा सत्कार करण्यात आला.या संदर्भात त्यांनी श्रीराम जन्मभूमी ट्रस्ट यांच्याशी पत्रव्यवहार करून,लाडूच्या वितरणाची परवानगी घेऊन, त्या ठिकाणी ६ एप्रिल म्हणजेच रामनवमीच्या दिवशी लाडूच्या प्रसादाचा भोग दाखवून त्यांच्या हस्ते वितरण सुरू होईल असे सांगण्यात आले.

# ब्रह्माकुमारीच्या वतीने दादी जानकी यांचा पाचवा स्मृती दिवस साजरा



**■अकोला,दि २७ (प्रतिनिधी):**

ब्रह्माकुमारी हिरपूर शाखेच्या वतीने दादी जानकीजींचा पाचवा स्मृतिदिन जागतिक अध्यात्मिक प्रबोधन दिन म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी सर्व सभासदांनी दादीजींच्या प्रतिमेला आदरांजली वाहिली व त्यांच्या जीवनात प्रेम, साधेपणा, सत्यता यांसारखे गुण अंगीकारण्याची शपथ घेतली.

यावेळी ब्रह्मकुमार सोपानभाईनी सांगितले की, दादी जानकीजींचा जन्म १९१६ मध्ये हैदराबाद सिंध प्रांतात झाला.दादी वयाच्या २१ व्या वर्षी संस्थेत रुजू झाल्या. २००७ मध्ये दादीजी संस्थेच्या मुख्य प्रशासीका बनल्या. दादीच्या अथक आणि निस्वार्थ सेवेमुळे संस्थेचे ज्ञान जगातील १४० देशांमध्ये पोहोचले. दादीने फक्त चौथीपर्यंतच शिक्षण घेतले आणि ४६००० ब्रह्माकुमारी बहिणींच्या आईप्रमाणेच सांभाळे.

वयाच्या १०३ व्या वर्षीही त्या १२ तास सेवा करत असत आणि पहाटे ४:०० वाजता उठून ध्यान करत असत.

